BC - 20-21

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

वर्ष तिसरे

# भाव अनुबंध
## दिवाळी २०२०

कार्यकारी संपादक
**श्री. सर्वोत्तम सताळकर**
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
**श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर**
**सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग**

**संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,**
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२. दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७
email-s.satalkar@yahoo.com / marathimandalklb@gmail.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

**मूल्य : रु. १५०/-**
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने 'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

*ही दिवाळी आणि नवे वर्ष आमचे सर्व लेखक, कवी, साहित्यिक, मुद्रक, वर्गणीदार, मंडळाचे सभासद आणिहितचिंतक यांना सुख, समृद्धी आणि समाधानाचे जावो ही शुभेच्छा!!*

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

MAHAVIDYALAYA SELU

लेख

# मराठी सण-उत्सवांचे बदलते स्वरूप

डॉ. राजाराम झोडगे

मराठी संस्कृतीची एक समृद्ध आणि वैभवशाली खूण म्हणजे येथील जनमानसातील सण-उत्सवांची परंपरा. मराठी माणूस आणि एकूणच भारतीय लोक हे उत्सवप्रिय आहेत. त्यामुळे आपल्याकडे विविध सण-उत्सव, जत्रा, यात्रा यांना नेहमीच उधाण आलेले असते. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात तेथील रूढी, प्रथा-परंपरांनुसार अनेक सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. सणांच्या निमित्ताने जीवनातील दुःख, समस्या, चिंता काही काळ का होईना विसरून, सुखाचे दोन क्षण अनुभवले जातात. यानिमित्ताने माणसं एकत्र येतात. सामाजिक देवाण-घेवाण होते. नोकरी-व्यवसायानिमित्त दूर गेलेली कुटुंबातील माणसं, मित्र एकत्र येऊन गप्पागोष्टी होतात. ख्यालीखुशाली, नवनवीन गोष्टी कळतात.

सण-उत्सवांच्या निमित्ताने घरी नवीन पदार्थ चाखायला मिळतात. काबाडकष्ट करणारी, हातावर पोट असणारी माणसंही पैसा जमवून, उसनवारी किंवा प्रसंगी कर्ज काढून सण साजरे करतात. परिस्थितीने गांजलेल्या आणि चटणी-भाकरीवर दिवस काढणाऱ्या सर्वसामान्यांना गोडधोड खायला मिळते ते सण-उत्सवांतच. लग्न होऊन नांदायला गेलेल्या सासुरवाशिणीला माहेरी येण्यासाठी निमित्त मिळते ते सणांचेच. बच्चेकंपनीसाठी नवीन कपडे, हौसमौज मिळते तेही सण-उत्सवांच्याच काळात.

सण-उत्सवांच्या निमित्ताने नातेवाईक, शेजारी, मित्र, भिन्नधर्मीय यांच्यात खाद्यपदार्थ, वस्तू, विचार यांची देवाण-घेवाण होऊन सामाजिक एकसंधपणाचे दर्शन घडते. माणसांना जवळ आणण्याचं, एकत्र बांधून ठेवण्याचं, भावनिक एकोप्याबरोबरच सामाजिक एकात्मता साधण्याचं मौलिक कार्य उत्सव करत असतात. त्यामुळे आपल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात सण, उत्सव, जत्रा-यात्रा यांना महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसते.



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

सण-उत्सवांच्या निर्मितीमागच्या हेतूचा विचार करता रूढी, प्रथा, परंपरा, धार्मिक श्रद्धा अशी विविध कारणे आपणाला दिसतात. अनेक सण हे परंपरा, श्रद्धा यातून निर्माण झाल्याचे दिसत असले तरी त्यापाठीमागे निसर्ग, प्राणी यांच्याविषयीचा कृतज्ञ भाव तसेच ऋतुचक्र, विज्ञान, आरोग्य अशा बाबींचेही संदर्भ असल्याचे दिसून येते. उत्सवांच्या निर्मितीसंबंधी डॉ. उषा देशमुख म्हणतात, 'मानवाच्या बौद्धिक आणि भावनिक आविष्कारातून विशिष्ट सण आणि उत्सव यांची ऋतुकालनिष्ठ आणि परिस्थितीनिष्ठ अशी निर्मिती झाली आहे. त्या निर्मितीतून मानवी जीवनाची विकसनशीलता आणि सांस्कृतिक प्रगती यांचे दर्शन घडत असते. एकीकडे परंपरा टिकविण्याचे कार्य आणि दुसरीकडे बदलत्या कालमानाप्रमाणे परंपरेस पूरक व उपयोजित बदल घडवून आणण्याचे कार्य संस्कृतीतून होत असते. व्यक्ती, कुटुंब, समाज आणि समष्टी यांना एका विशिष्ट नियमनात बांधून ठेवण्याचे उद्दिष्ट सण व उत्सवांच्या निर्मितीतून पूर्ण होत असते.'[१] प्रत्येक सणाला स्वतःचा इतिहास व महत्त्व आहे. लोकदेवता, आख्यायिका, एखादी घटना इत्यादींची पार्श्वभूमी सण-उत्सवांना लाभलेली असते. काळानुरूप या उत्सवांना स्थानिक, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ जोडले जातात. सण-उत्सवांच्या निमित्ताने म्हटली जाणारी गाणी, ओव्या, रचली-वाचली जाणारी आख्याने यातून लोकवाङ्मयात भर पडते.

कृषिनिष्ठता किंवा कृषिसंबद्धता हा मराठी सण उत्सवांचा एक महत्त्वाचा विशेष होय. आपल्या देशातील बहुसंख्य लोकांच्या जगण्याचा शेती हा प्रमुख आधार आहे. त्यामुळे आपल्या लोकपरंपरेतील प्रत्येक बाबीला कृषिसंस्कृतीचे अधिष्ठान लाभलेले दिसते. सण-उत्सव आणि कृषिजीवनाचा सहसंबंध स्पष्ट करताना द. ता. भोसले म्हणतात, 'लोकसंस्कृतीच्या जडणघडणीमध्ये कृषिजीवनाचा व निसर्गाचा फार मोठा सहयोग आढळतो. लोकसंस्कृतीला कृषिसंस्कृती म्हणावे इतके एकरूपत्व यामध्ये दिसून येते. आज आपणाला ग्रामीण जीवनात जे सण-सोहळे आणि देवदेवतांचे पूजाविधी आढळतात; ते सारे कृषिजीवनाशी निगडित आहेत. लोकजीवनातले कितीतरी सण हे कृषिसंस्कृतीचे सण आहेत.'[२]

वेगवेगळ्या सणांच्या निमित्ताने निसर्ग व शेतीशी संबंधित पशू, वृक्ष, सूर्य, भूमी यांची पूजा, उपासना केली जाते. दिवाळी, पोळा, नागपंचमी, वेळा अमावस्या असे सण व तत्संबंधी विधी हे कृषिजीवनाशी निगडितच असलेले दिसतात.

सण-उत्सव, विधी, उपासना, जत्रा-यात्रा इत्यादींच्या माध्यमातून निसर्ग, पशू, वृक्ष, जल, अग्नी, आकाश, भूमी, देवता यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. मराठी संस्कृतीमध्ये गुढीपाडवा, वटपौर्णिमा, नागपंचमी, नारळी किंवा राखी पौर्णिमा, पोळा, दसरा, दिवाळी, अक्षय तृतीया, वेळा अमावस्या, मकरसंक्रांत, होळी, धुलीवंदन असे कितीतरी सण साजरे केले जातात. तसेच लोकदेवता, स्थानिक परंपरा यानुसार जत्रा-यात्रा, उत्सव साजरे केले जातात. जत्रा-यात्रांच्या निमित्ताने परिसरातील पाहुणे, माणसं एकत्र येतात. नवीन खरेदी केली जाते. लोकदैवतांचे विधी, नवस-सायास यांची पूर्तता केली जाते.

उत्सव, जत्रा यांचे केवळ धार्मिक महत्त्वच असते असे नाही; तर काबाडकष्ट करणाऱ्या सामान्यजनांचा विरंगुळा, मनोरंजन म्हणूनही याकडे पाहावे लागते. उत्सव-जत्रांच्या निमित्ताने रंगणारे कुस्त्यांचे फड, तमाशांचे फड यातून लोक घटकाभर का होईना; पण आपल्या विवंचना, दुःख विसरून आनंदाचा अनुभव घेत असतात. बच्चेकंपनीसाठी तर जत्रा-यात्रा, उत्सव ही आनंदाची पर्वणीच असते.

आज आपण जेव्हा सण-उत्सव यांचा विचार करतो तेव्हा त्यात पूर्वीच्या तुलनेत अनेक बदल झालेले



NUTAN MAHAVIDYALAYA SELU
PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist. Parbhani

जाणवतात. या बदलांच्या पाठीमागे अनेक कारणे दिसून येतात. आजचे युग हे आधुनिकता, विज्ञान-तंत्रज्ञानाचे युग आहे त्यामुळे लोकांच्या मनावरील धार्मिकता, पारंपरिकता यांचा पगडा कमी झालेला असल्याने जनमानसाचा सणांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेला आहे. सण साजरे करण्यात पूर्वीसारखी आत्मीयता राहिली नाही, केवळ औपचारिकता म्हणून त्याकडे पाहिले जाते आहे. वाढते नागरीकरण, जागतिकीकरणाचा प्रभावही सण-उत्सव साजरे करण्यावर पडलेला दिसतो. शहरीकरणामुळे सणांची ग्रामीण, कृषी पार्श्वभूमी नष्ट होताना दिसते आहे.

पूर्वी लोकांची बेताची आर्थिक स्थिती, दळणवळणाची मर्यादित साधने यामुळे सर्वसामान्यांना नवीन वस्तू, पदार्थ, कपडे इत्यादींच्या खरेदीसाठी सण-उत्सव, जत्रा-यात्रा यांचेच निमित्त असायचे; आज मात्र उन्नत होत असलेला आर्थिक स्तर, उत्पन्नाची साधने, श्रीमंती, खेड्यांचे झपाट्याने होत असलेले शहरीकरण, व्यापारीकरण, ऑनलाईन बाजार यामध्ये सर्व सुखसोयींची सहज होत असलेली उपलब्धता अशा अनेक कारणांमुळे सण-उत्सवांचे, जत्रांचे अप्रूप किंवा ओढ समाजात राहिलेली दिसत नाही. शिवाय आजच्या व्यस्त, गतिमान व धकाधकीच्या जीवनात माणसांना तेवढी फुरसतही मिळत नसल्याने अनेक सण-उत्सवांकडे केवळ औपचारिकता म्हणून पाहिले जाते.

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. सण-उत्सवांच्या संदर्भाने मराठी संस्कृतीत अनेक इष्ट-अनिष्ट बदल झालेले दिसतात. सण-उत्सव, जत्रांच्या निमित्ताने होणाऱ्या पशुहत्या, कर्मकांड, अंधश्रद्धा व अन्य कुप्रथा यांचे प्रमाण कमी होताना दिसते आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र, अन्य काही बदलांमुळे सणांच्या मूळ स्वरूप, हेतू, संस्कृतीला बगल दिली जात आहे. सण-उत्सव साजरे करण्यातील पारंपरिकता, श्रद्धा नष्ट होताना दिसते आहे. उत्सव साजरे करण्याची पद्धत बदलते आहे.

आज उत्सव हे सण न राहता उत्सवांना Events चे स्वरूप प्राप्त होत असून त्यामागील मूळ उद्देश बाजूला पडत आहे. दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा, हे पारंपरिक न राहता ते कॉर्पोरेट होताना दिसत आहेत. लोकसंघटन, जनजागृती, प्रबोधन, श्रद्धा, आस्था यांऐवजी प्रदर्शन, मनोरंजन, दिखावा, स्पर्धा, गट-तट अशा बाबींना उत्सवांमध्ये महत्त्व प्राप्त होऊ लागले आहे. मराठी संस्कृतीतील अनेक सण-उत्सवांना कृषिसंस्कृतीचे अधिष्ठान आहे. किंबहुना त्यावरच ती आधारलेली आहेत; परंतु आज सणांची कृषिसंबद्धताही कमी होताना दिसते आहे.

नव्या पिढीला या उत्सवांची पार्श्वभूमी, परंपरा, पद्धती माहिती नाही. दिवाळी या सणाचे उदाहरण घेतले तरी आपल्या लक्षात येईल की, वसुबारसेला (गोवत्स द्वादशी) केली जाणारी गाय-वासराची पूजा, दिवाळीत शेणापासून बनवलेल्या गवळणी, गोवर्धन, पांडव यांची आणि बलिप्रतिपदेला शेतकऱ्यांचा राजा बळीराजाची पूजा, त्याची पार्श्वभूमी नव्या पिढीला माहिती नाही. पशूधनाची कृतज्ञता म्हणून केले जाणारे पूजन, 'इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो' असा व्यक्त केलेला आशावाद किंवा 'दिन-दिन दिवाळी, गाई म्हशी ओवाळी' अशी गीते यांपासूनही आजची पिढी अनभिज्ञ दिसते. नागपंचमी, हादगा, भोंडला, मंगळागौर आणि अन्य सणांच्या प्रसंगी म्हणावयाची गाणी नवीन पिढी विसरली. यामुळे परंपरेने चालत आलेला मौखिक आविष्कार, लोकवाङ्मयाचा अनमोल ठेवा ऱ्हास पावण्याच्या मार्गावर आहे. नवीन कपडे, फटाके आणि गोड पदार्थ म्हणजेच दिवाळी अशी नव्या पिढीची धारणा होते आहे.

गणेशोत्सव, नवरात्रोत्सव अशा उत्सवांमागील मूळ हेतू, श्रद्धाभाव कमी होऊन उत्सवप्रियता, स्पर्धा वाढली. अशा उत्सवांत

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

लोकप्रबोधन, मनोरंजनासाठी होणारे कार्यक्रम तसेच गाणी, भारूड, खेळे, दशावतार, आराध्यांची गाणी, लेझीम अशा मराठी संस्कृतीतील लोककला मागे पडून गरबा, दांडिया, डीजे यांचे प्रस्थ वाढताना दिसत आहे.

मोबाईल, लॅपटॉप यांच्याशी खेळणाऱ्या नवीन पिढीला नागपंचमीचे झोके, दिवाळीचे अभ्यंगस्नान, दसऱ्याचे सीमोल्लंघन, पारंपरिक खेळ, जत्रा यांचे अप्रूप राहिले नाही. यात्रांतील कुस्तीचे, तमाशांचे फड यांना उतरती कळा लागली असून यात्रेत हमखास घेतल्या जाणाऱ्या रेवड्या, फुटाणे, जिलेबी, शेव अशा खाद्यपदार्थांची जागा पावभाजी, दोसा, दाबेली, पिझ्झा, बर्गर, पाणीपुरी, मांचुरियन अशा दाक्षिणात्य, पाश्चात्त्य, चायनीज पदार्थांनी घेतली. माती, लाकडाच्या खेळण्यांचा बाजार चिनी प्लास्टिक खेळण्यांनी काबीज केला. त्यामुळे स्थानिक कलाकार, उत्पादक, विक्रेते डबघाईस आले आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रस्थ वाढले.

सण साजरे करण्याच्या पद्धतीतही दिवसेंदिवस आमूलाग्र बदल होताना दिसताहेत. ग्रामीण भागातही पारंपरिक पद्धतीने उत्सव साजरे करण्याऐवजी शहरी संस्कृतीचे अनुकरण केले जात आहे. पूर्वी सण-उत्सवांच्या निमित्ताने कुटुंब, नातेवाईक, मित्रपरिवार, शेजारी एकत्र येत असत. विचार, पदार्थांची देवाणघेवाण होत असे. त्यातून सामाजिक सुसंवाद निर्माण होण्यास मदत होई. आज सण हे केवळ आपल्या कुटुंबापुरतेच सीमित, मर्यादित झाले आहेत. सणांसाठी हमखास गावी येणारे कुटुंबातील नोकरदार, उद्योग-व्यवसाय करणारे सदस्य गावी न येता आहेत त्या ठिकाणीच सण साजरे करू लागलेत. नातेसंबंधांमध्ये औपचारिकता आल्याने माहेराचे, मामाच्या गावाचे आकर्षण कमी झाले त्यामुळे लहान मुलांचे मामाचे गाव, सासुरवाशिणीचे माहेर काहीसे परके झाले आहे. दिवाळी सणासाठी पंधरा-वीस दिवस माहेरी येणारी लेक 'यांना जास्त सुट्टी नाही' म्हणून भाऊबीजेला एक दिवस माहेरी येऊन परत जाऊ लागली आहे.

सण-उत्सवांच्या निमित्ताने केले जाणारे धार्मिक विधी, पूजा-उपासना, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच या संदर्भाने गायिली जाणारी लोकगीते, ओव्या अशा अनेक बाबीही मागे पडून सणांचे व्यापारीकरण होत आहे. महागड्या वस्तूंची खरेदी-विक्री, घरांची रंगरंगोटी, सजावटीची चढाओढ यातून आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन घडवले जात आहे. सणांचे निमित्त व लोकांची मानसिकता लक्षात घेऊन उत्पादक कंपन्या, व्यापारीवर्ग यांच्याकडून विविध जाहिराती, ऑफर्सच्या माध्यमातून उत्सव हायजॅक केले जात असून यातून चंगळवादाला प्रोत्साहन मिळते आहे. उत्सव साजरे करण्याचे संदर्भ, पद्धती बदलत आहेत. सणाला मिळणारी सुट्टी, ती संधी साधून केले जाणारे पर्यटन, खाणेपिणे, खरेदी,वारेमाप खर्च करणे म्हणजेच केवळ सण-उत्सव अशी धारणा आज निर्माण होते आहे.

सण-उत्सवांच्या निमित्ताने घरी बनवले जाणारे पारंपरिक खाद्यपदार्थही आज हद्दपार होताना दिसताहेत. पदार्थ घरी बनवण्यापेक्षा बाजारात तयार (रेडिमेड) मिळणाऱ्या पदार्थांकडे कल वाढला आहे. शिवाय पूर्वी फक्त सणावारालाच लोकांना गोडधोड खायला मिळत असे, आज मात्र आर्थिक सुबत्ता आणि सहज उपलब्धतेमुळे रोजच दिवाळी अशी स्थिती झाल्याने गोड खाद्यपदार्थांचेही अप्रूप राहिले नाही.

नव्या पिढीने काही सण-उत्सवांचे आपापल्यापरीने भलतेच अर्थ घेतल्याने काही सणांच्या निमित्ताने समाजात विकृतीही निर्माण होताहेत. होळी, धुळवड, गटारी अशा प्रसंगी दारू, गांजा, भांग पिणे ही जणू संस्कृतीच बनत आहे. त्यातून नवी पिढी अनेक व्यसनांच्या आहारी जात असल्याचे दिसते आहे.

व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्वीटर, टेलिग्राम अशा

( कृपया पान १३४ पाहा....

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist Parbhani

धक्के : धक्का - ढकल - संस्कृत 'धक्कम', धक्, प्राकृतात 'धक्क' असे रूप आहे.

## निष्कर्ष

अवजारे व साधनांची नावे अस्सल देशी आहेत. उदा. 'पास' हा शब्द प्राचीन मराठीत 'पासू' आहे, तर 'रुमण' या शब्दाचे रूप 'रुंभणे' असे प्राचीन मराठीत आहे. 'गाडी' या रूपाचे प्राकृतात 'गड्डी' असे रूप आढळते. 'ढकली' हे 'ढकल' या क्रियेपासून बनलेले शब्द आहे. तीन फणांची म्हणून 'तिफण', दोन फणाची म्हणून 'दुफण' असे रूप बनले. 'इळत', 'ईळा' हे देशी शब्द आहेत. प्रमाण मराठीत 'उकरी' असे रूप बनले.

संस्कृत 'अक्ष' या रूपाचे मराठीत 'आख', 'आक' असे बनले आहे. 'युग' या संस्कृत शब्दाचे 'जू' हे मराठी रूप बनले आहे. 'छट' या संस्कृत रूपाचे 'साटा' हे मराठी रूप होते. संस्कृत 'हलिषा' या रूपाचे 'आळीस' असे रूप बनले आहे. परभाषेतील शब्द 'शिपाई' हा फारशी असून मराठीत तसाच आलेला आहे. फारशी शिपाई म्हणजे सैन्य असा अर्थ असला तरी गाडीस लावण्याचे टेकन या अर्थी मराठीत आलेला आहे. 'बतई' हा फारशी शब्द मराठीने तसाच उचलला आहे. 'गदडं', 'कत्ती', 'कुदळ' 'मोट', 'कोयता' हे शब्द कानडी रूपाचे आहे. 'हाइळ, 'उडया', 'कुण्णी' असे शब्द शेतकऱ्याच्या तोंडी आहेत. 'धाव' हा शब्द व्दअर्थी वापरतात. याचा एक अर्थ गाडीच्या चाकाला बसविलेली जी लोखंडी पट्टी असते ती व त्याचाच दुसरा अर्थ ज्यावरून मोट हाकलली जाते, त्यास 'धाव' असा शब्द आहे.

आजच्या यंत्रयुगामुळे होत असलेली शेतीची प्रगती, सुधारणा, विविध संशोधन केलेले बियाणे यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होत आहे. आपण प्रगती केली तरी पण पारंपरिक अवजारे व साधने यांची नावे लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्याविषयी मराठी माणसांना जुन्या अवजारांची माहिती व्हावी.

- प्रा. दत्तात्रय मारुतीराव माने
अभिरूची निवास, शिवकृपा कॉलनी,
शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि. लातूर.
मोबा. : ९४०३८६६६५१

पान ११९ वरून....)

समाज माध्यमांच्या युगात आभासी मेसेजेस, शुभेच्छांच्या माध्यमातून सण साजरे करण्यात धन्यता मानली जाते आहे. उत्सवामागील सांस्कृतिक, सामाजिक, नैसर्गिक धारणा, अनौपचारिकता यांऐवजी औपचारिकता, व्यावसायिकता, श्रीमंतीचे प्रदर्शन यांचे दर्शन होताना दिसत आहे.

कालौघात मराठी संस्कृतीतील अनेक सण साजरे करण्याच्या पारंपरिक पद्धती, हेतू लयास जात असून पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करणाऱ्या नव्या पिढीत व्हॅलेंटाईन डे, प्रपोज डे, ३१ डिसेंबर यांसारखे दिवस उत्सव म्हणून साजरे केले गेले तर नवल वाटू नये अशी स्थिती आज निर्माण होत आहे...

## संदर्भ

१) देशमुख, डॉ. उषा, 'प्राचीन कवितेतून व्यक्त होणारे सण व उत्सवदर्शन', सरोजिनी बाबर (संपा.) सण-उत्सव, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्यमाला, पुष्प २७वे, प्र. आ. जानेवारी, १९८८, पृष्ठ १४५.

२) भोसले, द. ता., संस्कृतीच्या पाऊलखुणा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. मार्च २००१, पृष्ठ- सतरा (मनोगत)

- डॉ. राजाराम अ. झोडगे
नूतन महाविद्यालय, सेलू, जि. परभणी, महाराष्ट्र.
मोबा. : ९४२०७८६९७२



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU Dist. Parbhani